**उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/म.शि.५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २४ जुलै, २०२३

वाचा:-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:एसआरव्ही २०१५/प्र.क्र.२९०/का-१२, दि.१६ जुलै, २०१५
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दि.२५मे, २०१७.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:पदनि-०६१७/प्र.क्र.२०/२०१६/आ.पु.क., दि.०९ जून, २०१७.
४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:पदनि-०६१७/प्र.क्र.२०/२०१६/आपुक, दि.२९ जून, २०१७.
५) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५ दिनांक २३.४.२०१८.
६) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/म.शि.५, दि. ०३.११.२०१८.
७) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.०४ मे, २०२०.
८) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्रक्र.१७०/मशि-५ दिनांक २३.३.२०२१.
९) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि. २४ जून, २०२१.
१०) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्रक्र.१२५ (भाग-८)/मशि-५ दिनांक १२.११.२०२१.

**प्रस्तावनाः-**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात रिक्त असलेल्या प्राचार्य व शिक्षक/शिक्षकेत्तर पदांपैकी उच्च स्तरीय सचिव समितीने मान्यता दिलेली एकूण ४७३८ पदांच्या पदभरतीस संदर्भ क्रमांक ६ च्या शासन पत्रान्वये वित्त विभागाच्या सहमतीने मान्यता दिलेली आहे. त्यापैकी सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील-१४९२ पदे भरण्यात आलेली आहेत. मात्र, कोविड-१९ च्या प्रदूर्भावामुळे उद्भवलेली राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता, वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये पदभरतीवर निर्बंध आणलेले असल्यामुळे उर्वरित पदांची पदभरती करता आली न्हवती. मात्र, विद्यार्थ्यांचे हित आणि विभागाची निकड पाहता, केवळ सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील उच्च स्तरिय सचिव समितीने मंजूर केलेल्या ३५८० पदांपैकी भरलेली १४९२ पदे वजा जाता उर्वरित २०८८ पदांच्या पदभरतीस, वित्त विभागाच्या सहमतीने शासनाच्या संदर्भ १० येथील शासन निर्णयान्वये वित्त विभागाच्या दिनांक ०४.५.२०२० व दिनांक २४.६.२०२१ च्या शासन निर्णयातील अट शिथिल करून, पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे.

२.	राज्य शासनाने पदवीस्तरावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांना वर्ष २०२३-२४ पासून लागू केलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० अंतर्गत अभ्यासक्रम आणि मुल्यमापन प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कौशल्यपूर्ण अध्यापकांची आवश्यकता असणार आहे. सदर धोरणामुळे स्वायत्त महाविद्यालयांतील अभ्यासक्रमात रचनात्मक बदल होत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहाय्यक प्राध्यापक पदभरती करणे आवश्यक आहे.

३.	दिनांक १२.११.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील एकूण २०८८ पदांच्या पदभरतीस दिलेल्या मान्यतेस अनुसरून दिनांक ३०.१०.२०२२ पूर्वी ना-हरकत प्रमाणपत्रासाठी मागणीपत्र सादर करण्याच्या सूचना शासन पत्र दिनांक ११.१०.२०२२ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व संबंधित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना देण्याचा निर्देश देण्यात आले होते. उक्त कालमर्यादेत मागणीपत्र सादर न केल्यास, त्यांना वाटप करण्यात आलेली पदे ज्या महाविद्यालयांनी NAAC या संस्थेकडून महाविद्यालयाचे मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकनाअंती A+ व A दर्जा प्राप्त केलेल्या महाविद्यालयांना तसेच, ज्या महाविद्यालयांना स्वायतत्ता प्राप्त झालेली आहे, अशा महाविद्यालयांना वाटप करून त्याबाबतचा अहवाल शासन मान्यतेस्तव सादर करण्याबाबत निदेश देण्यात आलेले आहेत. तत्पूर्वी संबंधित महाविद्यालयांस नैसर्गिक न्यायानुसार एक संधी द्यावी. तरीही त्या महाविद्यालयांकडून पदभरतीसाठीचे मागणीपत्र सादर न झाल्यास, सदरहू महाविद्यालयास पदांची आवश्यकता नाही, असे गृहीत धरून, त्यांना वाटप करण्यात आलेली पदे उक्त नमूद महाविद्यालयांना शासन मान्यतेने वाटप करण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

४.	सहाय्यक प्राध्यापक पदभरतीसाठी पदे अनुज्ञेय केलेल्या महाविद्यालयांपैकी अदयापही ना-हरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांना संचालनालयाचे दिनांक १५.०६.२०२३ पर्यंत प्रस्ताव सादर करण्याबाबत अंतिम संधी देण्यात आली होती. त्यानुसार संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून दिनांक १९.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या तपशीलानुसार ९४ महाविद्यालयांनी ना-हरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव सादर केलेले नाही. सदर सहायक प्राध्यापक पदभरतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव अद्यापही शासनास सादर न करण्याची कारणे संचालक, उच्च शिक्षण संचालनालयाने पुढीलप्रमाणे कळविलेली आहेत.

अ.	संस्थेची अनुसूची अद्यायावत नसणे

ब.	व्यवस्थापनांतर्गत वाद असणे.

क.	संस्था/महाविद्यालयातील न्यायालयीन प्रकरण असल्याने.

ड.	संस्थेची/ महाविद्यालयाची बिंदुनामावली प्राधिकरणाकडून प्रमाणित नसणे.

५.	विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक ०३.७.२०२३ च्या पत्रान्वये खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत. प्राध्यापकांचा गुणवत्तापूर्ण सहभाग हा उच्च शिक्षणाच्या सर्व संस्थांच्या यशात सर्वात महत्त्वाचा घटक आहे. तसेच सर्व शैक्षणिक प्रक्रियेचे ते आधारस्तंभ आहेत. संस्थेमध्ये शिक्षणासाठी अनुकूल वातावरण तयार करणे, विशिष्ट कार्यक्रम विकसित करणे, शिक्षण आणि मुल्यमापन प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि विदयार्थांना समाजाचे जबाबदार सदस्य म्हणून विकसित करणे ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्याकडे आहे. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षक सदस्यांच्या उपलब्धतेतील कोणतीही कमतरता अध्यापन प्रदान प्रणालीवर प्रतिकुल परिणाम करते. म्हणूनच योग्य पात्र आणि सक्षम उमेदवारांसह रिक्त प्राध्यापक पदे भरणे आवश्यक आहे.

६. उच्च स्तरीय सचिव समितीने मंजूर केलेल्या ३५८० पदांपैकी २०८८ पदांच्या पदभरतीस संदर्भ क्र.१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्देश, राज्याचे नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी व काही महाविद्यालयांना संधी देऊनही पदभरतीबाबत दाखविलेली अनास्था विचारात घेऊन अदयापही ना-हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांची सहायक प्राध्यापक संवर्गातील उर्वरित पदे ज्या महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्राप्त आहे, अशा महाविद्यालयांना वाटप करण्यात यावी, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णयः</u>**-

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार २०८८ पदांपैकी उर्वरित पदे स्वायत्त महाविद्यालयांना वाटप करावयाचे असल्यास प्रत्येक महाविद्यालयास ७१.२०% भरता येतील. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयात स्वायत्त दर्जा प्राप्त असणारी एकूण ८४ महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयांपैकी १८ महाविद्यालयांमध्ये ७१.२०% पदे भरलेली आहेत. उर्वरित ६६ महाविद्यालयांना दि. १.१०.२०१७ रोजीच्या विद्यार्थी संख्येवर आधारीत अनुज्ञेय पदांच्या मर्यादेत २०८८ पैकी शिल्लक असलेल्या पदांचे वाटप समप्रमाणात म्हणजे प्रत्येक महाविद्यालयातील ७१.२०% भरले जातील या पद्धतीने करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने ६६ स्वायत्त महाविद्यालयांना ४५१ पदांचे वाटप करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहेः-(सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार)

अ) प्रथमतः अतिरिक्त ठरलेल्या सहायक प्राध्यापक यांचे रिक्त पदांवर तातडीने समायोजित करण्यात यावे. संबंधीत विषयाकरीता सहायक प्राध्यापक पद अतिरिक्त नसल्याचे विभागीय सहसंचालकांनी प्रमाणित केल्यानंतरच संबंधीतांना पदभरतीची जाहिरात देता येईल.

आ) केंद्राने संर्वगनिहाय आरक्षण धोरण केल्यामुळे, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये /संस्थांमधील शिक्षकीय पदांचे संवर्गनिहाय आरक्षण धोरण सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१.४.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्याबाबत विभागाने दिनांक ०७.४.२०२२ रोजीची अधिसूचना निर्गमित केली आहे. त्यानुसार आरक्षण धोरणाची नेमकी कार्यपध्दती कशी असावी, याबाबत विभागाच्या दिनांक ११.४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उपरोक्त पदांना आरक्षण लागू राहील.

इ) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २४.६.२०२२ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्र शैक्ष्णिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अंमलात येण्यापूर्वी सुरू झालेल्या व अद्याप पर्यत पूर्ण न झालेल्या भरती प्रक्रीयेस सदर अधिनियमातील तरतुदी लागू होणार नाहीत. तथापि प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे NOC ची मुदत संपल्यास मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा.

ई) शासनाने मंजूर केलेल्या पदसंख्येच्या मर्यादेत पदभरती केली जावी. मात्र, मान्य असलेल्या रिक्त पदांपैकी कोणते विषयाची पदे प्रथम भरावी हा निर्णय संबंधीत महाविद्यालयाचा असेल. त्या व्यतिरिक्त पदांवरील पदभरती केल्यास अशा उमेदवारांच्या वेतनाची जबाबदारी ही संबंधीत संस्थेची असेल.

उ) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याच्या अनुषंगाने उच्चस्तरीय सचिव समितीने काही बाबींची पूर्तता करण्याचे निर्देश दिलेले असल्याने, अद्याप आकृतिबंध निश्चित झालेला नाही. त्यामुळे पदभरतीवरील निर्बंध शिथील करुन उपरोक्त प्रमाणे पद भरतीस मान्यता देतांना दिनांक ०१.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे ही आधारभूत मानून अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत. तथापि, आकृतिबंध अंतिम झालेला नसल्याने, आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत सदरची पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत.

ऊ) अकृषि विद्यापीठ संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अनुज्ञेय पदभरती करताना विद्यापीठ अधिनियमातील विहीत तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच विहीत प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात यावेत.

ऋ) याबाबत मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला संचालकांनी शासनास सादर करावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३०७२४१२३७००९२०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

ASHOK S MANDE

Digitally signed by ASHOK S MANDE
DN: CN = ASHOK S MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Date: 2023.07.24 12:42:15 +05'30'

**(अशोक शं. मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
८. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर/मुंबई, महाराष्ट्र/मुंबई १/२.
१०. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. सर्व जिल्हा कोषाधिकारी यांची कार्यालये.
१३. सर्व कार्यसने (मशि)
१४. म.शि.५ कार्यासन, निवडनस्ती.

| विवरणपत्र - अ | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विभाग** | **महाविद्यालयाचे नाव** | **मंजूर पदे** |
| १ | अमरावती | एच.व्ही.पी.एम.शा.शि.म.वि.अमरावती. बी.पी.एड. | ११ |
| २ | अमरावती | एच.व्ही.पी.एम.शा.शि.म.वि.अमरावती. बी.पी.ई | २ |
| ३ | जळगाव | मूळजी जेठा महाविद्यालय जळगाव | १४ |
| ४ | जळगाव | प्रताप महाविद्यालय अमळनेर | १९ |
| ५ | कोल्हापूर | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | २७ |
| ६ | कोल्हापूर | दे.भ.रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर | २ |
| ७ | कोल्हापूर | छ.शाहू इन्स्टीटयुट ऑफ बिझनेस एज्युकेशन अन्ड रिसर्च, कोल्हापूर | १२ |
| ८ | कोल्हापूर | कमला कॉलेज, कोल्हापूर | ६ |
| ९ | कोल्हापूर | यशवंतराव चव्हाण इन्स्टि.ऑफ सायन्स, सातारा | १८ |
| १० | कोल्हापूर | छत्रपती शिवाजी कॅालेज,सातारा | ३ |
| ११ | कोल्हापूर | सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | ४ |
| १२ | मुंबई | सिंध एज्युकेशनीस्ट असोशिएशन, जय हिंद महाविद्यालय,ए रोड, चर्चगेट , मुंबई -२० | १ |
| १३ | मुंबई | सेंट झेविअर्स सोसायटी, सेंट झेविअर्स महाविद्यालय,मुंबई ०१ | १२ |
| १४ | मुंबई | श्रीमती पी डी हिंदूजा ट्रस्ट, के पी बी हिंदुजा वाणिज्य महाविद्यालय, ३१५ न्यु चर्नी रोड , मुंबई ०४ | १ |
| १५ | मुंबई | जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटी, विल्सन महाविद्यालय, गिरगाव चौपाटी, मुंबई ०७ | ८ |
| १६ | मुंबई | सोफीया महिला महाविद्यालय, मुंबई -२६ | ७ |
| १७ | मुंबई | साउथ इंडियन वेल्फअर सोसाएटी , एन आर स्वामी वाणिज्य व अर्थशास्त्र आणि श्रीमती तिरूमालाई विज्ञान महाविद्यालय, वडाळा, मुंबई ३१ | ३ |
| १८ | मुंबई | डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे, किर्ती डुगरंसी महाविद्यालय, दादर, मुंबई २८ | ११ |
| १९ | मुंबई | सेवा मंडल एज्युकेशन सोसाएटी, डॉ भानुबेन महेन्द्र नानावटी कॉलेज ऑफ होम सायन्स, माटुंगा , मुंबई -१९ | ६ |
| २० | मुंबई | सेवा मंडल एज्युकेशन सोसाएटी, श्रीमती मनीबेन एम पी शहा महीला कला व वाणिज्य महाविद्यालय, माटुंगा , मुंबई -१९ | १ |
| २१ | मुंबई | शिक्षण प्रसारक मंडळी पुणे, रामनारायण रूईया महाविद्यालय, माटुंगा , मुंबई १९ | १ |

ASHOK S MANDE

Digitally signed by ASHOK S MANDE
DN: CN = ASHOK S MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Date: 2023.07.24 12:42:49 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | मुंबई | साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी कला , विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सायन पश्चिम, मुंबई २२ | २ |
| २३ | मुंबई | साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी कला , वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, सायन पश्चिम, मुंबई २२ | ३ |
| | | | |
| २४ | मुंबई | विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे कला , विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चेंबूर , मुंबई ७१ | १ |
| २५ | मुंबई | हिंदी विद्या प्रचार समिती, रामनारायण निरंजन झुनझुनवाला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, घाटकोपर पश्चिम , मुंबई -८६ | १२ |
| २६ | मुंबई | उत्तर भारत सभा, रामानंद आर्या डि ए व्ही महाविद्यालय, भांडुप पूर्व, मुंबई-४२ | २ |
| २७ | मुंबई | विनायक वझे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुलूंड पश्चिम, मुंबई ८१ | १३ |
| २८ | मुंबई | चेतना हजारीमल सोमाणी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, श्रीमती कुसूमताई चौधरी कला महाविद्यालय, बांद्रा पुर्व , मुंबई ५१ | ५ |
| २९ | मुंबई | सर विठ्ठलदास ठाकरसी कॉलेज ऑफ होम सायन्स , सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४९ | ८ |
| ३० | मुंबई | पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन, साठये महाविद्यालय, विलेपार्ले पुर्व, मुंबई ५७ | ५ |
| ३१ | मुंबई | श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ, मिठीबाई कला , चव्हाण विज्ञान संस्था आणि अमृतबेन जीवनलाल वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, विलेपार्ले पश्चिम, मुंबई -५६ | ९ |
| ३२ | मुंबई | विलेपार्ले केळवाणी मंडळ एन. एम. वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, विलेपार्लै, मुंबई ५६ (स्थापना १९६१) | ५ |
| ३३ | मुंबई | तोलाणी कॉलेज ऑफ कॉमर्स, शेर ए पंजाब सोसायटी, अंधरी (पू), मुंबई-९३ | ४ |
| ३४ | मुंबई | भारती विद्या भवन, भवन्स महाविद्यालय, अंधेरी पश्चिम, मुंबई ५८ | १४ |
| ३५ | मुंबई | चिकीत्सक समुहाचे एस एस आणि एल एस पाटकर कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोरेगाव पश्चिम, मुंबई ६२ | ५ |

ASHOK S MANDE

Digitally signed by ASHOK S MANDE
DN: CN = ASHOK S MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Date: 2023.07.24 12:43:04 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | मुंबई | मालाड कांदीवली एज्युकेशन सोसाएटी , नगीनदास खंडावाला वाणिज्य , कला, आणि व्यवस्थापन आणि शांताबेन नगीणदास खांडवाला विज्ञान महाविद्यालय, मालाड पश्चिम, मुंबई -६४ | ६ |
| ३७ | मुंबई | कांदीवली एज्युकेशन सोसाएटी, बी के श्रॉफ कला महाविद्यालय व एम एच श्रॉफ वाणिज्य महाविद्यालय, कांदीवली पश्चिम, मुंबई -६७ | २ |
| ३८ | मुंबई | साधना एज्यु.सोसायटीचे श्रीमती कपीला खांडवाला कॉलेज ऑफ एज्युकेशन जुहू रोड, सांताक्रुझ प, मुंबई ५४ | ३ |
| ३९ | मुंबई | के.जे.सोमेय्या विज्ञान वाणिज्य महाविद्यालय मुंबई | २ |
| ४० | मुंबई | एच.आर. कॉलेज ऑफ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट | २ |
| ४१ | नागपूर | जी. एस. कॉमर्स कॉलेज, नागपूर | २ |
| ४२ | नागपूर | जे. बी. विज्ञान महाविद्यालय, वर्धा | ४ |
| ४३ | नांदेड | राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर | २ |
| ४४ | पनवेल | रयत शिक्षण संस्था, सातारा. कर्मवीर भाऊराव, पाटील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, नवी मुंबई | २ |
| ४५ | पनवेल | केरळीया समाजम शिक्षण संस्थेचे, मॉडेल वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली, ठाणे | १ |
| ४६ | पनवेल | डोबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे, के.व्ही.पेंढारकर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, डोबिवली | २२ |
| ४७ | पनवेल | बा.ना. बांदोडकर, विज्ञान महाविद्यालय, ठाणे. | १५ |
| ४८ | पनवेल | सिनिअर सिटीझन्स एज्यु. सोसायटीचे बिर्ला, कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, कल्याण, जिल्हा ठाणे | ६ |
| ४९ | पनवेल | रत्नागिरी शिक्षण-प्रसारक मंडळाचे, आर.पी.गोगटे/जोगळेकर कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, रत्नागिरी | ९ |
| ५० | पनवेल | श्री.पंचम खेमराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग | ३ |
| ५१ | पुणे | नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे- १ | १२ |
| ५२ | पुणे | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे | ५ |
| ५३ | पुणे | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे | ५ |
| ५४ | पुणे | आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे-४. | ९ |
| ५५ | पुणे | गरवारे वाणिज्य महाविद्यालय, पुणे - ४ | ५ |
| ५६ | पुणे | मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे | ३ |
| ५७ | पुणे | बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे | १ |

ASHOK S MANDE

Digitally signed by ASHOK S MANDE
DN: CN = ASHOK S MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Date: 2023.07.24 12:43:16 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| ५८ | पुणे | सिम्बॉयसिस महाविद्यालय, पुणे | ९ |
| ५९ | पुणे | प्रो. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी, पुणे | १ |
| ६० | पुणे | तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती | ५ |
| ६१ | पुणे | संगमनेर नगरपालिका महाविद्यालय, संगमनेर | ८ |
| ६२ | पुणे | न्यू आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज, अहमदनगर | १५ |
| ६३ | पुणे | आर.बी.एन.बी. कॉलेज, श्रीरामपूर | ९ |
| ६४ | सोलापूर | संगमेश्वर कॉलेज, सोलापूर | १७ |
| ६५ | सोलापूर | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्स, सोलापूर | ४ |
| ६६ | सोलापूर | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर | ५ |
| **एकुण पदे** | | | ४५१ |

ASHOK S MANDE

Digitally signed by ASHOK S MANDE
DN: CN = ASHOK S MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Date: 2023.07.24 12:43:28 +05'30'

**( अशोक शं.मांडे )**

**(उप सचिव), महाराष्ट्र शासन**